॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462)215572

**Academic-1 (BOS) Section**

website: srtmun.ac.in

E-mail: bos@srtmun.ac.in

Phone: (02462)215542

**शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून लागू करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरण–२०२० नुसार घ्यावयाच्या तासिका, भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System) व भारतीय संविधान (Constitution of India) ई. संदर्भातील नियमावली.**

## प रि प त्र क

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत येणाऱ्या संलग्नित महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण –२०२० ची अंमलबजावणी बी.ए., बी.कॉम. व बी.एस.सी. पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी करण्यात येत आहे त्यानुसार पदवी प्रथम वर्षाच्या तासिकांचा कालावधी व भारतीय ज्ञान परंपरा, भारतीय संविधान ई. विषय निवडण्यासंबंधाने विविध महाविद्यालयाकडून अनेकदा विचारणा केली जात आहे. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे नियमावली जाहीर करण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासनाच्या दि. २० एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयात व दि. १३ मार्च २०२४ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकात निर्देशीत केल्याप्रमाणे व विद्यापरिषदेने मान्य केल्याप्रमाणे पदवी प्रथम वर्षासाठी लागू करण्यात आलेल्या नवीन श्रेयांक आराखड्यनुसार घड्याळी एक तासाची (६० मिनिट ) तासिका सैद्धांतिक (Theory) अभ्यासक्रमासाठी तर प्रात्यक्षिकसाठी (Practical)दोन घड्याळी तासांची (१२० मिनिट) तासिका असेल. तसेच पदव्युत्तर स्तरावर प्रथम व द्वितीय वर्षासाठी सैद्धांतिक (Theory) अभ्यासक्रमासाठी एक घड्याळी तास (६० मिनिट) व प्रत्येक प्रात्यक्षिक (Practical) साठी दोन घड्याळी तासांचा (१२० मिनिट) अवधी दर्शविण्यात आला आहे. त्यानुसार तासिकाचे नियोजन महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर करावे.

२. पदवी प्रथम सत्रातील भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge System - IKS) व द्वितीय सत्रातील भारतीय संविधान (Constitution of India) हे दोन्ही विषय सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना अनिवार्य आहेत व त्याचा अभ्यासक्रम सर्व विद्याशाखेतील विद्यार्थ्यांसाठी एकच आहे. हे दोन्ही विषय मराठी व इंग्रजी भाषांमध्ये शिकवण्याची व विद्यार्थ्यांना परीक्षेत मराठी व इंग्रजी भाषांमध्ये उत्तरे लिहिण्याची मुभा असेल.

सदरील परिपत्रक पदवी प्रथम वर्ष, पदव्युत्तर प्रथम व द्वितीय वर्षात प्रवेश घेत असलेले विद्यार्थी, प्राध्यापक व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे, ही विनंती.

'ज्ञानतीर्थ' परिसर,
विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६.
**जा.क्र.:शै–१/एनईपी/नियमावली/२०२४–२५/१६०**
**दिनांक २२.०७.२०२४**

डॉ. सरिता लोसरवार
सहा.कुलसचिव
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीस्तव :
१) मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.सहयोगी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.संचालक, परीक्षा मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ.
५) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये व न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ.
६) मा.संचालक, सर्व संकुले व उपरिसर प्रस्तुत विद्यापीठ.
७) सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.